| | | | | |
|---|---|---|---|---|
| सत्यमेव जयते | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव | **महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग**<br>**राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय**<br>उरो रुग्णालय परिसर, तिसरा मजला, औंध, पुणे-४११०२७ | सार्वजनिक आरोग्य विभाग | G20 |


| | | |
|---|---|---|
| **उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजीआ)**<br>**तथा उपमुख्य निबंधक जन्म व मृत्यू**<br>**महाराष्ट्र राज्य पुणे -१** | | संकेतस्थळ: arogya.maharashtra.gov.in<br>कार्यालय : ०२० - २६०५९५३०<br>नानोप विभाग: ०२० – २६०५८२९२<br>ई- मेल:crs_d81@yahoo.com |


| | |
|---|---|
| **आरोग्य सेवा** | जा.क्र.आमाजीआ/ कक्ष ८१/ ना.नो.प्र/ज-मृ. नोंदणी/Frequent Review/ 6037-146 /२०२६<br>दिनांक २७ /०५ /२०२६ |

प्रती,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी,
तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू,
जिल्हा परिषद ............सर्व

२) जिल्हा शल्य चिकित्सक, सर्व

३) वैद्यकीय आरोग्य अधिकारी, मनपा सर्व

४) कार्यकारी आरोग्य अधिकारी, मुंबई मनपा

**विषय : जिल्हा निबंधक स्तरावर CRS पोर्टलवरील अहवालांचे नियमित परीक्षण करून बनावट नोंदणी ओळखण्याबाबत.**

संदर्भ :१) मा. सहसंचालक, भारत सरकार, या कार्यालयाचे पत्र क्र. F.No.1/12/2024-VS-(CRS) दिनांक 13-10-2025

२) या कार्यालयाचे पत्र क्र. आमाजीआ/ कक्ष-८१ / ना.नो.प./ज.-मृ. नोंदणी Advisory/१३९१९-५८/ २०२५ दिनांक ४-११-२०२५

३) मा. मुख्य निबंधक यांचे पत्र दिनांक ३०-१२-२०२५

४) मा. उप महानिबंधक, भारत सरकार, या कार्यालयाचे पत्र क्र. F.No. 1/12/2024-VS-(CRS)/2310 दिनांक 01-04-2026

५). या कार्यालयाचे पत्र क्र. आमाजीआ/ कक्ष-८१ / ना.नो.प./ज.-मृ. नोंदणी Advisory/४५३०-४६०७/२०२६ दिनांक २०-०४-२०२५

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, मा. महानिबंधक, भारत सरकार, नवी दिल्ली या कार्यालयाने केंद्र शासनाच्या CRS Portal या Online संगणक प्रणालीत निबंधक जन्म मृत्यू यांनी त्यांचा युजर आयडी, पासवर्ड व OTP हा कोणालाही शेअर करू नयेत आणि जन्म-मृत्यू नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या पासवर्डमध्ये वेळोवेळी बदल करावा, अशा माहितीचे शेअरिंग केल्यास अनधिकृत व्यक्तींमार्फत बनावट जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे तयार होण्याची शक्यता असते असे या कार्यालयाच्या संदर्भ ५ अन्वये सूचित करण्यात आले आहे.

संदर्भिय पत्र क्रमांक ४ अन्वये केंद्र शासनाने बनावट जन्म मृत्यू प्रमाणपत्र अनधिकृत व्यक्तींमार्फत वितरित करता येऊ नये यासाठी पुनश्चं खलील प्रमाणे दक्षता घेण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

१. वरील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने स्पष्ट सूचना देऊनही काही ठिकाणी User ID, Password व OTP ही माहिती इतर कोणत्याही व्यक्तिसोबत शेअर करणे अजूनही सुरू असून सूचनांचे पालन झालेले दिसत नाही. निबंधक/ जिल्हा निबंधक स्तरावर युजर आयडी, पासवर्ड आणि OTP शेअर केल्यामुळे काही ठिकाणी बनावट जन्म मृत्यू प्रमाणपत्रे वितरित झाल्याच्या घटना निदर्शनास आलेल्या आहेत व काही प्रकरणांमध्ये संबंधित राज्य सरकारकडून गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. म्हणूनच पुन्हा एकदा आपणास स्पष्ट करण्यात येते की, नोंदणी प्रक्रियेत सहभागी असलेले निबंधक/ उपनिबंधक व जिल्हा निबंधक यांनी कोणत्याही कारणास्तव आपला लॉगिन आयडी, पासवर्ड व OTP इतर कोणत्याही व्यक्तीसोबत शेअर करू नये असे केंद्र शासनाच्या (RGI) कार्यालयाच्या संदर्भ ४ च्या पत्रात नमूद केले आहे.

२. यास्तव काही प्रकरणांमध्ये जुन्या जन्म व मृत्यू घटनांची प्रमाणपत्रे डिजिटायझेशन करण्याच्या तरतुदीचा गैरवापर करून बनावट जन्म किंवा मृत्यू प्रमाणपत्रे तयार करून वितरित केली जात असल्याचे आढळून आले आहे. यावरून असे दिसून येते की काही नोंदणी निबंधक/उपनिबंधक जन्म व मृत्यू हे प्रमाणपत्रांचे डिजिटायझेशन करतांना आवश्यक ती दक्षता घेत नाहीत.

३. निबंधक / उपनिबंधक यांनी जुने जन्म व मृत्यू घटना नोंदीचे डिजिटायझेशन करतांना कोणतीही चूक न करता पुढीलबाबींचे काटेकोरपणे पालन करून नोंदणी करतील. डिजिटायझेशन करतांना मूळ जन्म मृत्यू प्रमाणपत्राची प्रत घेण्यात यावी, सदर प्रमाणपत्रातील नोंदीची माहिती जन्म मृत्यू नोंदवहीतील माहितीशी पडताळून पहावी, प्रमाणपत्रावरील स्वाक्षरी व दिनांक तापासले व पडताळले अशी नोंद करावी, जन्म मृत्यू नोंदवहीतील संबंधित नोंद सोबत प्रमाणपत्र जोडावे, तसेच डिजिटायझेशन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर तत्काळ अर्जदारास डिजिटाइज केलेले प्रमाणपत्र इलेक्ट्रॉनिक पद्धतीने किंवा इतर कोणत्याही माध्यमातून प्रदान करावे.

४. यास्तव, जिल्हा निबंधक यांनी त्यांच्या जिल्ह्यातील निबंधकांनी डिजिटाइज केलेल्या जन्म व मृत्यू घटनांचा नोंदणी केंद्र निहाय Report काढून दर आठवड्यात / दरमहा नियमितपणे पाहणी करावी. जेणेकरून एखाद्या किंवा अधिक नोंदणी केंद्रांमध्ये ही संख्या असामान्यरीत्या वाढलेली आहे का हे लक्षात येईल. त्याचप्रमाणे, नोंदविलेल्या एकूण जन्म व मृत्यू घटनांची संख्या देखील मासिक/ आठवडी आधारावर तपासून त्यामध्ये काही असामान्य वाढ झाली आहे का हे पडताळून पहावे.

५. सीआरएस पोर्टलद्वारे RU-निहाय डिजिटायझेशन अहवाल तसेच जन्म व मृत्यू अहवाल तयार करण्यासाठीचे वापरकर्त्यांची मार्गदर्शक पुस्तिका (User Manuals) अनुक्रमे परिशिष्ट-I व परिशिष्ट-II केंद्र शासनाने सोबत जोडून दिले आहेत, ज्यामुळे सर्व निबंधक यांना सोयीचे होईल.

६. वरील बाबींच्या अनुषंगाने, जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म मृत्यू यांनी व त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व निबंधक/ उपनिबंधक यांना त्यांचा युजर आयडी, पासवर्ड आणि OTP कोणालाही देऊ नयेत असे निर्देश देण्यात याव्येत आणि CRS पोर्टल वापरताना योग्य ती दक्षता घ्यावी व SOP चे काटेकोरपणे पालन करावे. तसेच, कार्यरत वापरकर्त्यांचे (जिल्हा/नोंदणी केंद्र /रुग्णालये इ.) लॉगिन तपशील नियमितपणे तपासून, पडताळून व अद्ययावत ठेवावेत.

७. जर एखाद्या कार्यक्षेत्रात जुन्या जन्म-मृत्यू नोंदीचे डिजिटायझेशन करतांना गैरवापर झाला आहे असे निदर्शनास आल्यास संबंधित व्यक्तींविरुद्ध निबंधक/जिल्हा निबंधक यांनी तात्काळ गुन्हा दाखल करवा व बनावट प्रमाणपत्रे रद्द करण्यासाठीचा प्रस्ताव जिल्हा निबंधक यांच्या मार्फत मा. मुख्य निबंधक, पुणे कार्यालयाकडे पाठविण्यात यावा व मा. मुख्य निबंधक, पुणे यांचे आदेश प्राप्त होताच निबंधक यांनी बनावट प्रमाणपत्रे लगेच CRS पोर्टल वरून रद्द करावीत आणि संबंधित दोषीविरुद्ध विभागीय चौकशीही सुरू करून केलेल्या कारवाईचा अहवाल (ATR) या कार्यालयास सादर करावा.

८. जिल्हयातील कोणत्याही निबंधक यांनी User ID, पासवर्ड व OTP इतर व्यक्तींसोबत शेअर केल्यामुळे झालेल्या फसवणुकीच्या घटनांबाबत **<u>जिल्हा स्तरावर होणाऱ्या समन्वय समिति सभा (DLCC)</u>** या बैठकांमध्ये नियमित अजेंडामध्ये समाविष्ट कराव्यात व त्यावर चर्चा करण्यात यावी.

करिता वरील संदर्भ क्रमांक ४ व ५ चे पत्र व वरील संपुर्ण सविस्तर सूचना आपल्या जिल्हयातील सर्व निबंधक जन्म मृत्यू यांना आपल्यास्तरावरुन न चुकता त्वरीत निर्गमित करण्यात याव्यात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.

डॉ. बबीता कमलापूरकर
उपसंचालक आरोग्य सेव (आ.मा.जी.आ.)
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यू
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत कार्यवाहीस्तव:-
उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळे (सर्व)

२/ वरीलप्रमाणे सूचना परिमंडळातील सर्व जिल्हयांना निर्गमित कराव्यात व आपल्या स्तरावर CRS पोर्टलवरील अहवालांचा दरमहा आढावा घेण्यात यावा.

प्रत माहितीस्तव सविनय सादरः-

१. मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग ,मंत्रालय मुंबई.
२. मा. सहसचिव, भारत सरकार तथा संचालक, जनगणना कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. मा.आयुक्त, आरोग्य सेवा, तथा अभियान संचालक रा.आ.अ, मुंबई.
४. मा. संचालक (रुग्णालये), आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
५. मा. संचालक (प्राथमिक) आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म मृत्यू, पुणे.